# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** धरमपेठ झोन क्र. 2 अंतर्गत प्रभाग क्र 14 येथे लॉ कॉलेज चौक ते
**{सा.बां.वि. झोन क्र. ०२}** राजभवन चौक, भोले पेट्रोल पंप ते आर.बी.आय. बँक व पत्रकार सहनिवास ते हिस्लॉप कॉलेज सिव्हिल लाईन येथे फुटपाथ व चौकाचे दुरुस्ती करण्याच्या कामास रु.21,86,148/- चे प्राकलनास कार्योत्तर प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या तसेच पद क्र. A22001330801 अंतर्गत तरतुद मुक्त करुन सदर काम हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5.2.2 अन्वये म.न.पा. पंजीबंध्द कंत्राटदार मे. संदिप के. चरडे यांना हे काम विधानसभेचे हिवाळी अधिवेशनामुळे अत्यंत तातडीने व ठराविक विशिष्ठ वेळेमध्ये व त्वरीत करावयाचे असल्याने प्राकलनीय दरावर कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करण्यास्तव मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी कार्योत्तर प्रशासकीय मंजुरी प्रदान केली असुन याची नोंद करुन मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :-

1. सदर्हु कामाला कार्यकारी अभियंता यांच्याद्वारे तांत्रिक मान्यता क्र. EE/PWD/T.S/193/2024-25 दिनांक 08/10/2024 नुसार तांत्रिक मान्यता प्राप्त आहे.
2. प्रस्तुत कामाकरीता सन 2024-25 चे आय व्ययकातील पद क्र. A22001330801 अंतर्गत खर्च प्रस्तावित आहे.
3. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :-** 1207/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 18/01 /2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धरमपेठ झोन क्र. ०२ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार धरमपेठ झोन क्र. 2 अंतर्गत प्रभाग क्र 14 येथे लॉ कॉलेज चौक ते राजभवन चौक, भोले पेट्रोल पंप ते आर.बी.आय. बँक व पत्रकार सहनिवास ते हिस्लॉप कॉलेज सिव्हिल लाईन येथे फुटपाथ व चौकाचे दुरुस्ती करण्याच्या कामास रु.21,86,148/- चे प्राकलनास कार्योत्तर प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या तसेच पद क्र. A22001330801 अंतर्गत तरतुद मुक्त करुन

सदर काम हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5.2.2 अन्वये म.न.पा. पंजीबंध्द कंत्राटदार मे. संदिप के. चरडे यांना हे काम विधानसभेचे हिवाळी अधिवेशनामुळे अत्यंत तातडीने व ठराविक विशिष्ठ वेळेमध्ये व त्वरीत करावयाचे असल्याने प्राकलनीय दरावर कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करण्यास्तव मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी कार्योत्तर प्रशासकीय मंजुरी प्रदान केली असुन याची नोंद करुन मंजुरी प्रदान करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.